**प्रेसनोट** **दि.२४.१२.२०१९**

**<u>शिर्षक</u>** :- श्री. संदीप वसंत पाटील, कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, शाखाधिकारी पाटबंधारे, शाखा आटपाडी यांना ५०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | आटपाडी पोलीस स्टेशन, गुरनं ३३९/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री. संदीप वसंत पाटील, कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, शाखाधिकारी पाटबंधारे, शाखा आटपाडी, वर्ग – ३, रा. कोष्ठी गल्ली, सिध्दीविनायक पतसंस्थेच्या समोर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नांवे शेटफळे, ता. आटपाडी येथे शेतजमीन असुन सदर शेतजमीनीसाठी शेटफळे, ल.पा. तलाव येथुन पाणी उचलण्यासाठी टेंभु उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन ओगलेवाडी यांचेकडुन घेणेत आलेल्या परवान्याची मुदत संपली असल्याने सदरचा परवाना नुतनीकरण करुन घेण्यासाठी तक्रारदार यांचे वडीलांनी मा. कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, ओकलेवाडी यांचेकडे अर्ज दिला होता. सदर अर्ज देते वेळी तक्रारदार हे संदीप पाटील, कालवा निरीक्षक यांना त्यांचे कार्यालयात भेटले असता त्यांनी अर्जासोबत आणलेल्या कागदपत्रात त्रुटी असल्याचे सांगुन सदर त्रुटींची पुर्तता करुन १५,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी इकडे फोन करुन कळविल्याने दि. २३.१२.२०१९ रोजी तक्रारदार यांची आटपाडी येथे येवुन सविस्तर तक्रार नोंदवुन घेतली.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२३.१२.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये संदीप पाटील, कालवा निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडीलांचा परवाना नुतणीकरण करुन देण्यासाठी ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम आटपाडी तहसील कार्यालय येथे घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच संदिप पाटील, कालवा निरीक्षक यांचेविरुध्द सापळा लावला असता संदीप पाटील, कालवा निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे परवाना नुतणीकरण करुन देण्यासाठी लाचेची मागणी केली असता तक्रारदार यांनी ५०००/- रुपये उपलब्ध झाले असुन १०,०००/- रुपये नंतर देतो असे सांगुन तक्रारदार यांनी त्यांचेकडील ५०००/- रुपये लाचेची रक्कम संदीप पाटील, कालवा निरीक्षक यांना दिली असता ती त्यांनी स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. श्री. संदीप वसंत पाटील, कालवा निरीक्षक, पाटबंधारे शाखा आटपाडी, रा. आटपाडी यांचे विरुध्द आटपाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६

संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप :- acbmaharashtra.net टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१